(असाधारण)

अधिसूचना

क्रमांक. १५५/२०२१ दिनांक : १७.१२.२०२१

विषय :- २०२२-२३ या शैक्षणिक सत्राचे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून संलग्नीकरण अर्ज (Online) भरण्याबाबतच्या अंतिम तिथीबाबत..

संदर्भ : विद्यापीठ निदेश क्र.५६/२०२१, दि.१६.१२.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भांकीत निदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१)(ट) प्रमाणे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करण्याबाबतची तरतूद आहे. सदर तरतुदीस अनुसरुन अधिष्ठाता मंडळाने विद्याविषयक लेखापरिक्षण मानके व कार्यप्रणाली तयार केली असून, विद्यापीठाच्या प्राधिकारीणीने त्याला मान्यता प्रदान केली आहे व त्याअनुषंगाने निदेश क्र.५६/२०२१, दि. १६.१२.२०२१ निर्गमित करण्यात आला आहे.

आणि

ज्या अर्थी, ज्या महाविद्यालयाचे विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखेचे संलग्निकरण संपलेले आहे. अशा महाविद्यालयांनी सत्र २०२२-२३ पासून विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करावयाचे आहे. त्याअर्थी, संबंधीत पात्र महाविद्यालयांनी संलग्नीकरण अर्ज सॉफ्टवेअरच्या माध्यमातून (Online) भरावयाचे आहेत. सदर (Online Portal) दि. १६.१२.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ पर्यंत सुरु राहील. निदेश क्र. ३२/२०२१, दि. १०.०६.२०२१ नुसार संलग्निकरण शुल्क भरण्यात यावे.

अर्ज (Online) भरण्यास खालील पध्दतीचा वापर करण्यात यावा.

१. www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाणे.
२. Online Service वर क्लिक करणे.
३. Online Application for Continuation of Affiliation वर क्लिक करणे.
४. Login करताना प्रथम Register वर क्लिक करुन स्वत:च्या महाविद्यालयाची नोंदणी या अगोदर केली नसल्यास करुन घेणे.
५. नोंदणी केलेल्या महाविद्यालयांनी सरळ Login करावे.
६. Continuation of Affiliation वर Click करावे.
७. अर्ज भरताना अडचण आल्यास मो.नं. ९८२३६४६१६८ / ०७२१-२५६६२४५ या दुरध्वनी नं. वर संपर्क करुन माहीती मिळविता येईल.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.